# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

क्र.मऔविम/म.व्य.(भूमी)/ C05504 दिनांक : 21/06/2019

## परिपत्रक

**विषय :- भूखंडाचे विभाजन केल्यानंतर विकास कालावधी देणेबाबत..**

महामंडळाच्या दिनांक १०.०६.२०१३ च्या परिपत्रकानुसार Appropriate Court / DRT / BIFR / Appropriate Government इत्यादिच्या निर्णयानुसार / आदेशानुसारची हस्तांतरणे जेथे विकास कालावधी शिल्लक आहे, अशा प्रकरणात भूखंड हस्तांतरणाचा आदेश निर्गमित झाल्यापासून २ वर्षे अथवा प्रभाग - निहाय अनुज्ञेय असलेला भूखंड विकासाचा उर्वरित कालावधी यापैकी जो कालावधी जास्त असेल तो कालावधीत देण्यात येतो. तसेच वित्तीय्य संस्थेमार्फत हस्तांतरणाबाबत देखील जेथे विकास कालावधी शिल्लक आहे अशा प्रकरणात भूखंड हस्तांतरणाचा आदेश निर्गमित झाल्यापासून २ वर्षे अथवा नियमानुसार संबंधीत प्रभागाकरीता(Zone) अनुज्ञेय असलेला भूखंड विकासाचा उर्वरित कालावधी यापैकी जो जास्त कालावधी असेल त्या कालावधीत उत्पादनात जाणे बंधनकारक राहील. तथापि दिनांक २७.०५.२०१५ च्या परिपत्रकानुसार भूखंडाचे विभाजन केल्यानंतर भूखंडाचे हस्तांतर करताना प्रभाग निहाय्य कालावधी देण्यात येतो. त्यामुळे प्रकरणी विभिन्नता दिसून येत आहे. त्यामुळे प्रकरणी सुधारणा करणे आवश्यक असल्याने याबाबतचा विषय संचालक मंडळाच्या दिनांक ११.०२.२०१९ रोजी झालेल्या ३७९ व्या बैठकीत चर्चा होवून ठराव क्र. ५८४७ पारीत करण्यात आला. सदरहू पारीत ठरावानुसार भूखंड हस्तांतरणानंतर भूखंड विकास कालावधी देण्याबाबतच्या दिनांक १०.०६.२०१३ तसेच दिनांक २७.०५.२०१५ च्या परिपत्रकामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

१. औपचारिक हस्तांतरण प्रकरणांमध्ये उदा. Appropriate Court / DRT / BIFR / Appropriate Government इत्यादिच्या निर्णयानुसार / आदेशानुसारची हस्तांतरणे जेथे विकास कालावधी शिल्लक आहे अशा प्रकरणात भूखंड हस्तांतरणाचा आदेश निर्गमित झाल्यापासून यापुढे **२** वर्षे भूखंड विकासाचा कालावधी राहील.

२. वित्तीय्य संस्थेमार्फत हस्तांतरणाबाबत देखील जेथे विकास कालावधी शिल्लक आहे अशा प्रकरणात भूखंड हस्तांतरणाचा आदेश निर्गमित झाल्यापासून यापुढे २ वर्षे विकास कालावधी राहील.

३. इमारत पूर्णत्वाचा दाखला(B.C.C) प्राप्त करुन उत्पादनात असलेल्या भूखंडाचे विभाजन केल्यानंतर, अशा सर्व मोकळया विभाजीत भूखंडांना यापुढे २ वर्षाचा विकास कालावधी लागू राहील.

सदरहू धोरण या परिपत्रकाचे दिनांकापासून लागू राहिल. सर्व संबंधितांनी सदर सुधारित धोरणाची नोंद घेऊन त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**(अविनाश सुभेदार)**
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी(प्रशासन)**
**मऔविम, मुंबई.**

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई